तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २० ऑगस्ट २०२५

आतील पानावर

पान २ – 'तेहरान' मध्ये जॉन नव्या अवतारात!
पान ३ – साराला जोडीदार मिळाला?
पान ४ – अनुष्काने लग्नाच्या चर्चांवर सोडलं मौन
पान ५– 'पालतू फालतू' मध्ये झळकणार रिंकू
पान ६ – दुसरा 'शोले' होऊ शकत नाही



# 'जटाधरा'त सोनाक्षीचा रौद्रावतार

अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आगामी 'जटाधरा' चित्रपटात पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात सोनाक्षीसोबत साऊथ अभिनेता सुधीर बाबू प्रमुख भूमिकेत आहे. तिच्या या चित्रपटाबाबत चाहते देखील उत्सुक होते. नुकतेच या चित्रपटाचा टिझर रिलीज झाला आहे. ज्यात सोनाक्षीचा खतरनाक लूक पाहायला मिळत आहे. सोनाक्षी सिन्हाने हा टीझर इंस्टाग्रामवर शेअर केला आहे. कॅप्शनमध्ये तिने लिहिलं आहे, बलिदानातून जन्मलेला एक नायक आणि लोभातून वाढलेलं अंधाराचं साम्राज्य, संघर्षाची सुरुवात झाली आहे. 'जटाधारा'चा टीझर आता प्रदर्शित झाला आहे. टीझरमध्ये सोनाक्षी एक प्रभावी लूकमध्ये पाहायला मिळत आहे. टीझरमध्ये सोनाक्षी सिन्हा एका शक्तिशाली आणि क्रूर देवीच्या रूपात दिसते. तिच्या चेहऱ्यावरचा राग, डोळ्यांतील अंगार आणि भेदक आवाज या सगळ्यामुळे सोनाक्षीचा लूक आजवरच्या सिनेमांपेक्षा वेगळा ठरतो. दुसरीकडे सुधीर बाबू शांत, पण दृढनिश्चयी योद्ध्याच्या रूपात आहे. सोनाक्षी आणि सुधीरमध्ये शेवटी युद्ध होताना पाहायला मिळतं. हा चित्रपट जी स्टुडिओच्या निर्मितीत आणि एस के जी एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली तयार केला जात आहे. चित्रपटात भव्य व्हीएफएक्सचा समावेश असेल. 'जटाधरा'चे दिग्दर्शन वेंकट कल्याण आणि अभिषेक जयसवाल यांनी केले आहे. हा चित्रपट या वर्षाच्या अखेरीस प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.





# रितेशच्या ‘राजा शिवाजी’त दिसणार विद्या बालन

मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतून आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना वेड लावणारा अभिनेता म्हणजे रितेश देशमुख. अभिनेता असण्याबरोबरच रितेश दिग्दर्शकसुद्धा आहे. वेड हा पहिला मराठी चित्रपट त्याने दिग्दर्शित केला आणि या चित्रपटाला प्रेक्षकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळाला. अशातच आता रितेश दिग्दर्शक म्हणून लवकरच छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित ‘राजा शिवाजी’ हा चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. काही दिवसांपूर्वी रितेशने या चित्रपटातील कलाकारांची नावे जाहीर केली होती. या चित्रपटात संजय दत्त, अभिषेक बच्चन, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, भाग्यश्री, फरदीन खान, जितेंद्र जोशी, अमोल गुप्ते, जिनिलीया देशमुखसह अभिनेत्री विद्या बालनही असणार आहे. एका मुलखतीत विद्याने तिच्या ‘राजा शिवाजी’ चित्रपटामधील भूमिकेबद्दलचा आणि रितेशबरोबरच्या कामाचा अनुभव शेअर केला. विद्या म्हणाली, हो! मी नुकतंच त्या चित्रपटाचं चित्रीकरण पूर्ण केलं. तो चित्रपट छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित आहे; पण आता मी त्याबद्दल आणि भूमिकेबद्दल जास्त काही बोलू शकत नाही. हा अनुभव खूपच कमाल होता. मी रितेशबरोबर ‘हे बेबी’मध्ये काम केलं आहे. दिग्दर्शक म्हणूनही तो उत्तम आहे. त्यानंतर ती म्हणते, दिग्दर्शक म्हणून काम करताना त्याला तो एक अभिनेता असल्याचीही मदतच झाली. पण त्यानं ज्या पद्धतीनं दिग्दर्शक म्हणून माझ्याबरोबर काम केलं तेसुद्धा मी खूपच एन्जॉय केलं. अशी कलाकृती करण्याचा त्याचा प्रयत्न वाखणण्याजोगा आहे. पुढे विद्याने म्हटले, या चित्रपटात संजय दत्तही आहेत. त्यांच्याबरोबरसुद्धा मी अनेक वर्षांनी काम करत आहे. आहोत. त्यांच्याबरोबरचा काम करण्याचा अनुभवही खूपच छान होता.




# ‘दबंग ४’ मधून चुलबुल पांडे लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला!

भाईजान सलमान खानचे चाहते त्याच्या आगामी चित्रपटांची आतुरतेने वाट पाहात असतात. २०१० मध्ये सलमानच्या दबंग या चित्रपटाचे मोठं कौतुक करण्यात आले होते. हा चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केली होती. या चित्रपटात सलमानने साकारलेला पोलीस अधिकारी चुलबुल पांडे प्रेक्षकांच्या लक्षात राहिला. दबंगवरचे प्रेक्षकांचे प्रेम पाहता चित्रपटकर्त्यांनी दबंग २ आणि दबंग ३ हे चित्रपट तयार केले. आता लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला दबंग ४ येणार असल्याची हिंट स्वतः सलमान खानने एका कार्यक्रमात दिली आहे. नुकतेच एका कार्यक्रमातून सलमानने एक कृती केली यामधून त्याने त्याच्या आगामी दबंग ४ बाबत हिंट दिली आहे. सलमान स्टेजवरती आल्यानंतर त्याच्या डोळ्यावरचा काळा चष्मा आणि अंगावरच टी शर्टने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाला आलेल्या लोकांशी बोलताना त्याने मध्येच डोळ्यांवरचा चष्मा काढला फोल्ड केला एकडे तिकडे पाहिले. समोरच्या एका व्यक्तीला वाटले की तो चष्मा कुठेतरी त्याला ठेवण्याचासाठी तो तसे करतोय. पण मूळात असे काही नव्हते. तर सलमानने त्याच्या मागच्या खिशात चष्मा टाकला. त्याच्या या कृतीने सर्वांचे लक्ष त्याच्याकडे वेधून घेतले. यावेळी भाईजानने थेट हे दबंग ४ साठी होते, असे म्हणत दबंग लवकरच भेटीला येणार असल्याची मोठी अपडेट दिली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, सलमान आणि त्याचा भाऊ अरबाज खान दबंग ४ वर काम करत आहेत. मात्र, चित्रपटाच्या कथेला घेऊन दोघांची मतं वेगळी आहेत. ज्यादिवशी चित्रपटाच्या कथेवर दोघांचेही एकमत होईल त्यावेळी दबंग ४ च्या शुटिंगला सुरूवात केली जाणार आहे.



# ‘तेहरान’ मध्ये जॉन नव्या अवतारात!

बॉलिवूड अभिनेता जॉन अब्राहम अभिनयासह त्याच्या जबरदस्त स्टाईलमुळे लोकप्रिय आहे. लवकरच ‘तेहरान’ चित्रपटात नव्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. यात तो एका गुप्तहेराच्या वेगळ्या भूमिकेत दिसणार आहे. नुकतेच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. अरुण गोपालन दिग्दर्शित या चित्रपटातील जॉनचा लूक अनेकांच्या पसंतीस पडत आहे. २०१२ मध्ये दिल्लीतील इस्रायली दूतावासाजवळ झालेल्या बॉम्बस्फोटावर हा चित्रपट आधारित आहे. या घटनेमुळे इस्राईल, इराण आणि भारत या देशांमध्ये तणाव वाढला होता. या पार्श्वभूमीवरची ही कथा थरारक आहे. ‘तेहरान’मध्ये जॉनने साकारलेला राजीव कुमार हा एक गुप्तहेर आहे, पण तो देशासाठी काम करतोय की कुणाच्या हातातील खेळणं बनतो, हेच सिनेमाचं मुख्य गूढ आहे. दरम्यान, इम्तियाज अली आणि मॅडॉक फिल्म्सने तयार केलेला हा चित्रपट अरुण गोपालन यांनी दिग्दर्शित केला आहे. यात जॉनसोबत मानुषी छिल्लर, नीरू बाजवा आणि मधुरिमा तुली यांच्याही भूमिका आहेत. जॉनचा हा आगामी चित्रपट ‘तेहरान’ ओटीटीवर पाहता येणार आहे. विशेष म्हणजे हा चित्रपट स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने, प्रदर्शित झाला आहे. याचा प्रीमियर ओटीटी प्लॅटफॉर्मवर आहे. हा चित्रपट यापूर्वी २०२३ मध्ये प्रजासत्ताक दिनी प्रदर्शित होणार होता, परंतु काही कारणांमुळे त्याची प्रदर्शन तारीख सतत बदलत गेली. आता मात्र प्रेक्षकांची प्रतीक्षा संपली आहे.

# श्रीश्री रविशंकर यांच्या बायोपिकमध्ये विक्रांत मेस्सी

'12th फेल' फेम अभिनेता विक्रांत मेस्सीचा 'आँखो की गुस्ताखियां' सिनेमा येत आहे. यामध्ये तो स्टारकिड शनाया कपूरसोबत दिसत आहे. यानंतर तो आगामी सिनेमाची तयारी सुरु करणार आहे. आध्यात्मिक गुरु श्रीश्री रविशंकर यांच्या बायोपिकमध्ये तो भूमिका साकारणार आहे. रविशंकर यांच्यासोबतचा विक्रांतचा फोटोही मध्यंतरी व्हायरल झाला होता. आता सिनेमाबाबतीत काही अपडेट समोर आले आहेत. विक्रांत मेस्सी लवकरच 'व्हाइट' सिनेमाचं शूटिंग सुरु करणार आहे. आध्यात्मिक गुरु आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्रीश्री रविशंकर यांच्या आयुष्यावर सिनेमा आधारित आहे. मिडिया रिपोर्टनुसार, या सिनेमाचं ९० टक्के शूट हे दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया देशात होणार आहे. हा फक्त बायोपिक नाही तर कोलंबियामध्ये ५२ वर्षांपासून सुरु असलेला संघर्ष रविशंकर यांनी शांततेच्या मार्गाने मिटवला होता. सर्व घटना या कोलंबियातील असल्याने सिनेमाचं शूट तिकडेच होणार आहे. विक्रांत मेस्सीने नुकतंच बंगळुरुतील आर्ट ऑफ लिव्हिंग आश्रमाला भेट दिली. यावेळी त्याने रविशंकर यांनी सुरु केलेल्या हॅपीनेस प्रोग्रॅममध्येही सहभाग घेतला. तिथे त्याने ध्यान, प्राणायम, योग साधना यासोबत रविशंकर यांची विचारधारा समजून घेण्याचा प्रयत्न केला. सिनेमात काम करताना काहीही बनावट किंवा दिखावा वाटू नये यासाठी त्याने सर्व गोष्टींचं निरीक्षण केलं. विक्रांतने आपल्या लूकमध्येही काही बदल करायला सुरुवात केली आहे. त्याने केस आणि दाढी वाढवली आहे. तसंच रविशंकर यांची बोलण्याची स्टाईल, हसणं, चालणं हे सगळं आत्मसात करायला सुरुवात केली आहे. तो त्यांच्या प्रवचनाचे व्हिडिओही बघत आहे. काही दिवसांनी विक्रांत शूटसाठी कोलंबियाला रवाना होणार आहे.

# फरहानच्या '१२० बहादूर'चा टीझर प्रदर्शित

फरहान अख्तरची मुख्य भूमिका असलेला '१२० बहादूर' या युद्धपटाचा दमदार टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात फरहान अख्तर १९६२ मधील 'रेझांग ला'च्या युद्धात शौर्य गाजवलेल्या परमवीर चक्र विजेत्या मेजर शैतान सिंह यांची भूमिका साकारत आहे. '१२० बहादूर' हा चित्रपट १९६२ च्या भारत- चीन युद्धातल्या 'रेझांग ला'च्या ऐतिहासिक लढाईवर आधारित आहे. या युद्धात फक्त १२० भारतीय जवानांनी सुमारे ३,००० चिनी सैनिकांशी सामना करत शौर्याची अजरामर गाथा लिहिली होती. '१२० बहादूर' चित्रपटाच्या या टीझरची सुरुवात एका हॉस्पिटलमधील सीनने होते, जिथे एक अधिकारी जखमी जवानाला विचारतो- रेझांगलामध्ये नेमकं काय घडलं? पुढील दृश्यांमध्ये भारतीय सैनिकांवर सुरू असलेल्या हल्ल्यांचं आणि बर्फाच्छादित क्षेत्रातील लढाईचं चित्रण पाहायला मिळत आहे. याशिवाय चित्रपटातील ही वर्दी फक्त हिंमतच नव्हे, तर बलिदानही मागतं, मागे हटणं मला मान्य नाही आणि आपण देशासाठी आपलं प्राण देण्यास तयार असलो पाहिजे. या संवादांमुळे अंगावर शहारे येत आहेत. तशा प्रतिक्रियासुद्धा अनेकांनी या टीझरखाली व्यक्त केल्या आहेत. २ मिनिट ८ सेकंदाच्या टीझरमध्ये सीमेवर सुरू असलेल्या या महायुद्धाचं भावनिक चित्रण पाहायला मिळत आहे. 'तुफान' (२०२१) नंतर फरहानचा हा चार वर्षांनंतरचा मोठा सिनेमा असून, त्याने साकारलेली मेजर शैतान सिंग यांची भूमिका खूपच प्रभावी असल्याचे या टीझरमधून पाहायला मिळत आहे. चित्रपटात फर्हान अख्तर, विवान भटेना, अंकित सिवाच, एजाज खान, राशी खन्ना यांसह मराठी अभिनेते अजिंक्य देव यांचीसुद्धा छोटीशी झलक पाहायला मिळत आहे. '१२० बहादूर' चित्रपटाविषयी अधिक सांगायचं झाल्यास, चित्रपटाचं दिग्दर्शन रजनीश घई यांनी केलं आहे. तर चित्रपटाचे निर्माते रितेश सिधवानी, फर्हान अख्तर, अमित चंद्रा हे आहेत. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.





# साराला जोडीदार मिळाला?

बॉलिवूडमधील अभिनेत्री सारा अली खान हिची विशेष भूमिका असलेला मेट्रो इन दिनो या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या चित्रपटातील भूमिकेमुळे सारा चर्चेत आली होती. प्रेक्षकांनी तिच्या भूमिकेचे कौतुक केले होते. सध्या सोशल मीडियावर साराचा एक व्हिडिओ व्हायरल झाल्याने तिच्या अफेअरच्या चर्चांना उधाण आले आहे. नुकतीच साराने दिल्लीतील एका गुरुद्वाराला भेट दिली. यावेळी तिच्यासोबत एक तरुण तिच्यासोबत उपस्थित होता. या तरुणाचे नाव अर्जुन प्रताप बाजवा असून दोघांच्या नात्यांची चर्चा सोशल मीडियावर रंगू लागली आहे. पल्लव पलिवाल या पापाराझीच्या इन्स्टाग्राम पेजवर सारा-अर्जुनचा व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे. सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आता अर्जुन प्रताप बाजवा हा कोण आहे याच्याविषयी चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान, अर्जुन प्रताप बाजवा हा एक अभिनेता, संगीतकार आहे. याशिवाय तो मार्शल आर्ट्समध्येदेखील निपूण आहे. अर्जुनच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास त्याने २०१५ साली आलेल्या 'सिंग इज ब्लिंग' या चित्रपटासाठी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले आहे. टबँड ऑफ महाराजाज'च्या माध्यमातून त्याने अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. अर्जुनची बॉलिवडूमध्येही अनेक कलाकारांची ओळख आहे. त्याच्या इन्स्टाग्रामवर फॉलोअर्समध्ये बीटाऊनमधील अनेक दिग्गज कलाकार आहेत. मात्र, अर्जुन आणि साराच्या रिलेशनशिपच्या चर्चा सुरू झाल्या असल्या तरी अद्यापर्यंत दोघांनीही याविषयी अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.

# दुलकर सलमान घेऊन येतोय चित्रपट



दुलकर सलमान केवळ दक्षिणेतच नाही तर बॉलिवूडमध्येही लोकप्रिय आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतही या अभिनेत्याचे चाहता वर्ग खूप मोठा आहे. दक्षिण सिनेमातील आपल्या रोमँटिक भूमिकांसाठी ओळखल्या जाणाऱ्या, दुलकर सलमान याने आतापर्यंत अनेक हीट चित्रपट दिले आहेत. 'लकी भास्कर' चित्रपटातही या अभिनेत्याने दमदार अभिनय केला आहे. आता 'लकी भास्कर'सारख्या यशस्वी चित्रपटानंतर अभिनेता दुलकर सलमान पुन्हा एकदा एका वेगळ्या आणि प्रभावी भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. आपल्या नव्या चित्रपटाची झलक अभिनेत्यानं चाहत्यांसोबत शेअर केली आहे. दुलकर सलमानचा नुकताच वाढदिवस होता. यानिमित्तानं त्यानं चाहत्यांना खास भेट दिली. अभिनेत्यानं आपल्या आगामी पीरियड ड्रामा असलेला 'कांथा' चित्रपटाचा टीझर प्रदर्शित केला आहे. 'कांथा' चित्रपटाची कथा १९५० च्या दशकातील आहे. सिनेसृष्टीतील अहंकार, मैत्री, प्रेम आणि सर्जनशील स्वातंत्र्याच्या संघर्षावर आधारित ही कथा एक अनुभवी दिग्दर्शक 'अय्या' आणि एक उगवता सुपरस्टार 'चंद्रन' या दोन महत्वाच्या व्यक्तिरेखांभोवती फिरते. या चित्रपटात दुलकर सलमानने 'चंद्रन' ही महत्वाची भूमिका साकारली आहे. तर समुथिरकानी यांनी 'अय्या' या व्यक्तिरेखेतून एक प्रभावी दिग्दर्शकची भूमिका ताकदीने उभी केली आहे. दुलकर सलमानची 'वेल्फेअर फिल्म्स' आणि राणा दग्गुबातीची 'स्पिरिट मीडिया' यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटात राणा दग्गुबाती, समुथिरकानी आणि भाग्यश्री बोरसे यांच्या महत्वपूर्ण भूमिका आहेत. हा चित्रपट १२ सप्टेंबर २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. दुलकर हा मल्याळी सुपरस्टार मामुट्टी यांचा तो मुलगा आहे. मोस्ट हॅन्डसम हिरो असूनही दुलकर सलमान अगदी फॅमिली मॅन आहे. दुलकरने चित्रपटात येण्यापूर्वीच लग्न केले होते. २२ डिसेंबर २०११ रोजी त्याने चेन्नईतील आर्किटेक्ट अमल सोफियासोबत लग्न केले होते. आज ते एका क्युट मुलीचे पालक आहेत. हे दोघांही सर्वांना कपल गोल्स देताना दिसतात.

# पवन कल्याण सोडणार अभिनय?



पॉवर स्टार म्हणून प्रसिद्ध असलेला दक्षिण अभिनेता पवन कल्याण सध्या त्याच्या आगामी 'हरि हरा वीरमल्लू' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. हा चित्रपट नुकताच थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे पवन कल्याण चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये सक्रियपणे दिसत नाही. आता या अभिनेत्याने त्याच्या भविष्यातील कारकिर्दीबद्दल एक मोठे विधान केले आहे आणि त्याच्या योजना सांगितल्या आहेत. आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री झाल्यानंतर पवन कल्याण त्यांच्या पूर्वी साइन केलेल्या चित्रपटांचे शूटिंग पूर्ण करत आहेत. तथापि, ते आता चित्रपटांकडे जास्त लक्ष देऊ शकत नाहीत, ज्यामुळे राजकारण आणि चित्रपट संतुलित केल्याबद्दल त्यांना टीकेचा सामना करावा लागत आहे. आता, या सर्वांना उत्तर देताना, अभिनेत्याने सांगितले की 'हरि हरा वीरमल्लू', 'दे कॉल हिम ओजी' आणि 'उस्ताद भगत सिंग' सारख्या चित्रपटांनंतर ते अभिनय सोडण्याचा विचार करत आहेत. राजकारणात प्रवेश केल्यानंतरही चित्रपट सुरू ठेवण्याच्या विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना पवन कल्याण म्हणाले की, जेव्हा मी हे तीन चित्रपट साइन केले तेव्हा मी निवडणुकीपूर्वी ते पूर्ण करण्याची योजना आखली होती. तथापि, काही राजकीय घटनांमुळे निवडणुकीपूर्वीचा वेळ वाया गेला. चित्रपट पूर्ण करण्यासाठी मला आणखी काही दिवसांची आवश्यकता असल्याने मी तिन्ही चित्रपटांच्या निर्मात्यांची माफी मागितली. सत्तेत आल्यानंतरही मी चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी वेळ काढला आणि दिवसातून फक्त दोन तास चित्रीकरण केले. अभिनेत्याने सांगितले की त्याने कोणताही नवीन प्रकल्प साइन केलेला नाही. मी 'ओजी' चे चित्रीकरण पूर्ण केले आहे आणि 'उस्ताद भगतसिंग' पूर्ण करण्यासाठी माझ्याकडे सुमारे पाच दिवस आहेत. भविष्यात, जर राजकारण आणि चित्रपटांमध्ये संघर्ष झाला तर मी अभिनय करणार नाही. मी चित्रपट सोडेन कारण माझे प्राधान्य प्रशासन आणि जनसेना पक्ष आहे. तथापि, मला माझ्या आर्थिक गरजांसाठी सिनेमाची आवश्यकता आहे. म्हणून मी भविष्यात चित्रपट निर्मितीवर लक्ष केंद्रित करेन. जरी मी अभिनय केला तरी तो दिवसातून फक्त दोन तासांसाठी असेल. पण सध्या मी दुसरा कोणताही चित्रपट साइन केलेला नाही.

# अनुष्काने लग्नाच्या चर्चांवर सोडलं मौन



'बाहुबली' हा मूळचा दाक्षिणात्य सिनेमात जगभरात गाजला. या सिनेमातील भूमिकेमुळे अभिनेता प्रभास ग्लोबल स्टार झाला. तसंच प्रभास आणि अनुष्का शेट्टीची केमिस्ट्री खूप गाजली. या सिनेमानंतर प्रभास आणि अनुष्काच्या चाहतावर्गात कमालीची वाढ झाली. तसंच दोघांनी खऱ्या आयुष्यातही लग्न करावं अशी चाहते नेहमीच इच्छा व्यक्त करतात. दोघंही आपापाल्या आयुष्यात अद्याप सिंगल आहेत. आता नुकतंच अनुष्काने लग्नाच्या चर्चांवर प्रतिक्रिया दिली आहे. अनुष्काचा आगामी 'घाटी' सिनेमा रिलीज होणार आहे. याआधी दिलेल्या एका मुलाखतीत अनुष्काने लग्नावर भाष्य केलं. ती म्हणाली, बाहुबली सिनेमानंतर माझ्यावर लग्नासाठी दबाव वाढला आहे. कुटुंबियांकडूनही सतत लग्नासाठी विचारणा होत आहे. माध्यमांमध्येही याच चर्चा सुरु आहेत. माझा लग्नसंस्थेवर विश्वास आहे. पण मी योग्य वेळ आली की मगच लग्न करेन. ती पुढे म्हणाली, मला लहान मुलं खूप आवडतात. पण मी जोवर कोणाच्या प्रेमात पडत नाही तोवर मला लग्न करायचं नाही. काहीही झालं तरी मी त्याच व्यक्तीशी लग्न करेन ज्याच्यावर माझं प्रेम आहे. माझ्या आईवडिलांचंही हेच म्हणणं आहे. योग्य व्यक्ती आणि योग्य वेळेची मी वाट पाहत आहे. मी फिल्म इंडस्ट्रीशी संबंधित कोणाशीही लग्न करणार नाही. अनुष्का शेट्टी दाक्षिणात्य इंडस्ट्रीतील आघाडीची अभिनेत्री आहे. तिने आतापर्यंत नागार्जुन, रवि तेजा, प्रभास या अभिनेत्यांसोबत काम केलं आहे. काही काळापासून ती स्क्रीनवरुन गायब होती. म्हणूनच तिच्या लग्नाच्या चर्चांना जोर धरला. मात्र आता ती 'घाटी'सिनेमातून कमबॅक करत आहे.

# 'दशावतार'मध्ये मराठी कलाकारांची मांदियाळी

'दशावतार' या आगामी चित्रपटाचा जबरदस्त टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाचे लूक पोस्टर व टीझर रिलीज झाल्यानंतर प्रेक्षकांमध्ये उत्सुकता पाहायला मिळतेय. दिग्गज अभिनेते दिलीप प्रभावळकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत टिझर प्रदर्शित करण्यात आला आहे. 'दशावतार' मध्ये या चित्रपटात मराठीतील दिग्गज आणि अत्यंत ताकदीचे कलाकार एकत्र आले असून दिलीप प्रभावळकर, महेश मांजरेकर, भरत जाधव, विजय केंकरे, सुनील तावडे, रवी काळे, सिद्धार्थ मेनन, प्रियदर्शिनी इंदलकर आणि अभिनय बेर्डे अशा दर्जेदार कलाकारांची मांदियाळी या चित्रपटाच्या टीझरमध्ये पाहायला मिळतेय.

'दशावतार' हा चित्रपट केवळ एक सस्पेन्स थ्रिलर नसून, भावनांचा, रूढी परंपरांचा, पारंपरिक




लोककलेचा आणि आधुनिक आव्हानांचा खेळ असावा असं या टिझरमधून लक्षात येत आहे. टीझरमध्ये दाखवलेली दृश्ये गूढता, भव्यता आणि थरार निर्माण करणारी आहेत. प्रत्येक पात्राची झलक दाखवणारा हा टिझर प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा आणि चित्रपटाची उत्सुकता अधिक ताणणारा आहे. कोकणातील भव्य निसर्ग दृश्ये, दशावतारी कलेशी संबंधित दृश्य आणि घनदाट अरण्य पाहून हा नेहमीपेक्षा वेगळा अनुभव देणारा चित्रपट असेल याची खात्री पटते आहे.

चित्रपटाचे लेखक व दिग्दर्शक सुबोध खानोलकर म्हणाले, 'दशावतार' ही कोकणातील मातीशी घट्ट जुळलेली पण जगभरातल्या प्रेक्षकांना सहज आपलीशी वाटेल अशी गोष्ट आहे. त्यातली भव्यता, थरारक प्रसंग आणि भावनिक क्षण हे प्रेक्षकांना आजवर न पाहिलेला अनुभव देतील अशी खात्री आहे. हा अनुभव घ्यायला चित्रपटगृहातच यावं लागेल अशा पद्धतीचा हा चित्रपट आहे. चित्रपटाचे निर्माते सुजय हांडे म्हणाले, या चित्रपटाच्या भव्यतेची झलक टीझरमध्येच दिसून येते. यात प्रेक्षकांना सिनेमॅटिकली काहीतरी नवीन आणि वेगळं पाहायला मिळणार आहे. अनुभवी कलाकारांच्या जबरदस्त अभिनयाने चित्रपट अधिक उठून दिसतो. या चित्रपटाबाबत झी स्टुडिओजचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर म्हणाले, बदलत्या काळानुसार मराठी प्रेक्षकांची चित्रपटाबद्दलची अभिरुचीसुद्धा बदलत आहे. हीच बाब लक्षात घेऊन दर्जा सोबतच नाविन्याची जोड असणाऱ्या कथांना प्राधान्य देण्याचे काम झी स्टुडिओज करत आहे. प्रेक्षकांना आपल्या मातीतील गोष्ट अतिशय वेगळ्या ढंगाने सांगणारा हा चित्रपट असून या चित्रपटामुळे प्रेक्षकांमध्ये आणि सिने सृष्टीमध्ये एक सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल असा विश्वास झी स्टुडिओच्या टीमला आहे. 'दशावतार' हा चित्रपट येत्या १२ सप्टेंबरला प्रदर्शित होणार आहे.

# सुबोध-मानसीचा 'हा' चित्रपट लवकरच भेटीला

काही चित्रपट आपल्या अनोख्या वैशिष्ट्यांमुळे घोषणेपासूनच चर्चेचा विषय ठरतात. यात चित्रपटाचे शीर्षक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. असेच अनोखे शीर्षक असलेला 'सकाळ तर होऊ द्या' हा मराठी चित्रपट सिनेसृष्टीपासून रसिकांपर्यंत सगळीकडे चर्चेचा विषय बनला आहे. या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख नुकतीच घोषित करण्यात आली आहे. हा चित्रपट १० ऑक्टोबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची निर्मिती नम्रता सिन्हा यांनी केली आहे. त्या सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते विनय सिन्हा यांच्या कन्या आहेत. ज्यांनी 'अंदाज अपना अपना' आणि 'नसीब' यांसारख्या अनेक अजरामर हिंदी चित्रपटांची निर्मिती केली आहे. आता नम्रता सिन्हा यांनी या चित्रपटाद्वारे मराठी सिनेसृष्टीत पदार्पण केले आहे. आजवर हिंदीत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणार्या आलोक जैन यांनी 'सकाळ तर होऊ द्या'चे लेखन व दिग्दर्शन केले आहे. जगण्याचा मंत्र देणाऱ्या या चित्रपटात सुबोध भावे आणि मानसी नाईक मुख्य भूमिकेत आहेत. अतिशय वेगळ्या जॉनरच्या या चित्रपटात सुबोध आणि मानसी आजवर कधीही न दिसलेल्या रूपात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. लवकरच 'सकाळ तर होऊ द्या'ची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. वास्तव परिस्थितीला सामोरे जात, तसेच असंख्य अडचणींवर मात करत जगण्याला नवी दिशा देणारी कथा या चित्रपटात प्रेक्षकांना पाहायला मिळेल. हिंदीतील सुप्रसिद्ध संगीतकार हिमेश रेशमिया यांची हिमेश रेशमिया मेलडीज या सिनेमातील गाणी रसिकांच्या भेटीला आणणार आहे. गीतकार अभिषेक खणकर यांनी लिहिलेली 'सकाळ तर होऊ द्या'मधील गाणी संगीतकार रोहित राऊत यांनी संगीतबद्ध केली आहेत.



# 'पालतू फालतू' मध्ये झळकणार रिंकू

साऊथ सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा प्रस्तुत 'बेटर-हाफची लव्हस्टोरी' या चित्रपटातील पहिलं गाणं 'पालतू फालतू' नुकतंच प्रदर्शित झालं असून, प्रेक्षकांसाठी एक भन्नाट, गंमतीशीर अनुभव घेऊन आलं आहे. सुबोध भावे आणि रिंकू राजगुरू यांच्यावर चित्रित झालेलं हे गाणं लग्नानंतरच्या परिस्थितीचा आरसा दाखवणारं आहे. सुबोध भावेच्या मनातील वैताग, गोंधळ आणि त्याच्या प्रतिक्रियांचा एक मिश्कील कोलाज या गाण्यातून मांडण्यात आला आहे. हे विनोदी गाणं सुप्रसिद्ध गायक अवधूत गुप्ते यांच्या आवाजात रंगलेलं असून ह्या गाण्याचे बोल संजय अमर आणि साजन पटेल यांनी लिहिलं असून अमेय नरे व साजन पटेल यांचं खटकेबाज संगीत 'पालतू फालतू' या गाण्याला लाभलं आहे. गाण्याविषयी दिग्दर्शक संजय अमर म्हणाले, 'पालतू फालतू' हे गाणं प्रत्येक नवऱ्याच्या मनातील हक्काच्या बडबडीचं प्रतिनिधित्व करतं. सुबोध आणि रिंकूने या दृश्यांना ज्या सहजतेने जिवंत केलं, ते खरंच बघण्यासारखं आहे.हे एक गंमतीशीर गाणं आहे. तर निर्माता रजत अग्रवाल म्हणतात, या गाण्यातून प्रेक्षकांना लग्नानंतरच्या नात्याची गंमतीशीर बाजू पाहायला मिळते. आजच्या तरुण प्रेक्षकांना ही शैली स्वतःशी मिळतीजुळती वाटू शकते आणि म्हणूनच हा चित्रपटही त्यांना जोडून ठेवेल. 'बेटर-हाफची लव्हस्टोरी' या चित्रपटाचं लेखन, छायांकन आणि दिग्दर्शन संजय अमर यांनी केलं आहे. रजत मीडिया एंटरटेनमेंट निर्मित या चित्रपटाचे निर्माता रजत अग्रवाल आहेत. साजन पटेल आणि अमेय नरे यांचे संगीत, तसेच सुबोध भावे, रिंकू राजगुरू, प्रार्थना बेहरे आणि अनिकेत विश्वासराव यांच्या दमदार भूमिका या सिनेमाला एक वेगळीच उंची देतात. गूढ, विनोद आणि प्रेमाचा अफलातून मेळ असलेल्या 'बेटर-हाफची लव्हस्टोरीचा टिझर आधीच चर्चेत आला असून आता हे गाणं देखील सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. येत्या २२ ऑगस्ट रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

# कंगनाच्या आगामी सिनेमाची घोषणा

कंगना राणौत आणि आर माधवनची जोडी चाहत्यांना खूप आवडते. दोघांनीही दोन चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आणि त्यांचे दोन्ही चित्रपट हिट ठरले. एक म्हणजे 'तनु वेड्स मनु' (२०११) आणि दुसरा 'तनु वेड्स मनु (२०१५) 'चा सिक्केल. दोन्ही चित्रपटांमध्ये कंगना आणि माधवनची केमिस्ट्री प्रेक्षकांना खूप आवडली. आता १० वर्षांनंतर ही जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर परतणार आहे. कंगना आणि माधवन यांनी एका नवीन प्रोजेक्टसाठी हातमिळवणी केली आहे. कंगना आणि आर माधवन हे सायकॉलॉजिकल थ्रिलर चित्रपट सर्कलमध्ये एकत्र दिसणार आहेत. दोघांच्या पुनरागमनाबद्दल चाहते उत्सुक आहेत. आगामी चित्रपट 'सर्कल' हा एक संपूर्ण भारतातील चित्रपट आहे, जो हिंदी, तमिळ आणि तेलुगूमध्ये एकाच वेळी चित्रित केला जाईल. त्याची निर्मिती जवळजवळ एक वर्षापासून सुरू आहे आणि आता चित्रीकरण शेवटच्या टप्प्यात आहे. कंगना-माधवनच्या चित्रपटाचे शेवटचे दृश्य तेलंगणातील हैदराबाद येथील ज्युबिली हिल्स येथील क्लब इल्युजन येथे चित्रित करण्यात आले होते. या सायकोलॉजिकल थ्रिलरचे चित्रीकरण भारतातील उटी, जयपूर, चेन्नई आणि हैदराबाद अशा वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आले आहे. या चित्रपटाची निर्मिती टिडेंट आर्टचे रवींद्रन करत आहेत, ज्यांनी या चित्रपटाचे शीर्षक निश्चित केले आणि कंगना राणौतच्या कामाचे कौतुकही केले. ही जोडी एका सायकॉलॉजिकल थ्रिलरमध्ये दिसणार आहे. निर्मात्याने असेही म्हटले आहे की हा चित्रपट या श्रेणीतील प्रेक्षकांनी यापूर्वी पाहिलेल्या कोणत्याही चित्रपटापेक्षा वेगळा आहे. 'सर्कल' हा चित्रपट अशा प्रकारचा पहिला सायकॉलॉजिकल थ्रिलर म्हणून वर्णन केला जात आहे, ज्यामुळे चाहत्यांमध्ये पात्रांबद्दल आणि कथेबद्दल उत्सुकता वाढत आहे. कंगना राणौत आणि आर. माधवन दोघेही त्यांच्या दमदार अभिनयासाठी ओळखले जातात, त्यामुळे चाहते या चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी उत्सुक आहेत.



# 'या' अभिनेत्रीचं दीपिकाशी अनोखं कनेक्शन

दीपिका पादुकोण ही हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री आहे. तिने २००७ च्या ब्लॉकबस्टर 'ओम शांती ओम' चित्रपटातून शाहरुख खानबरोबर पदार्पण केलं. त्यानंतर तिने अनेक विविधांगी भूमिका साकारल्या. दीपिकाबरोबर 'ओम शांती ओम' चित्रपटातून आणखी एका अभिनेत्रीने पदार्पण केलं होतं. दीपिकाने २०१८ मध्ये लग्न केलं, त्याच वर्षी या अभिनेत्रीने लग्न केलं आणि २०२४ मध्ये दीपिका आई झाली. याच वर्षी या अभिनेत्रीनेही आपल्या पहिल्या बाळाचं स्वागत केलं. दीपिका पादुकोणप्रमाणेच या अभिनेत्रीलाही मुलगीच झाली. आम्ही ज्या अभिनेत्रीबद्दल बोलतोय ती म्हणजे युविका चौधरी होय. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत, युविकाने तिच्या आणि दीपिकामधील या कनेक्शनबद्दल सांगितलं. 'ओम शांती ओम'मधून पदार्पण करण्यापूर्वी गायक हिमेश रेशमियाच्या संगीत अल्बम 'आप का सुरुर' मधील वेगवेगळ्या गाण्यांमध्ये युविका व दीपिका दोघींनी काम केलं होतं. दीपिका 'नाम है तेरा' या हिट गाण्यात दिसली, तर युविका 'वादा तेरा' मध्ये झळकली होती. युविका म्हणाली, मला आमच्या आयुष्यात इतकं साम्य आहे हे आधी लक्षात आलं नव्हतं. पण हेच नशिब आहे. पण आमच्यात नक्कीच काहीतरी कनेक्शन आहे. आम्ही हिमेश रेशमियाच्या अल्बममध्ये होतो. एका गाण्यात ती होती आणि मी दुसऱ्या गाण्यात होते. त्यावेळी आम्ही एकत्र बसून निवांत वेळ घालवायचो. युविकाने दीपिकाबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितला. ती खूप मेहनती आणि खूप चांगली मुलगी आहे. ती तिच्या कामाबद्दल प्रामाणिक आहे. कधीकधी लोक तिला ट्रोल करायचे तेव्हा मला राग येतो, असं युविका म्हणाली. दीपिकाला बॉलीवूडमध्ये खूप यश मिळालं, पण त्या तुलनेत युविकाचं करिअर फार चांगलं राहिलं नाही. युविकाने ओम शांती ओम, तो बात पक्की, समर २००७, नॉटी ४०, एनेमी या चित्रपटांमध्ये झळकली. नंतर तिने टीव्ही मालिका, रिॲलिटी शो केले. युविका व तिचा पती प्रिन्स नरुला नच बलिए ९ चे विजेते ठरले होते.



# दुसरा 'शोले' होऊ शकत नाही

अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, हेमा मालिनी, जया बच्चन ही बॉलीवूडमधील दिग्गज नावं आहेत. या चार लोकप्रिय कलाकारांनी जेव्हा एका चित्रपटात काम केलं तेव्हा तो चित्रपट फक्त हिट ठरला नाही, तर पुढे पिढ्यान् पिढ्या त्याबद्दल चर्चा होत राहिली. अर्थात, हा चित्रपट 'शोले' असून, आता हेमा मालिनी यांनी त्याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. हेमा मालिनी ९० च्या काळातील लोकप्रिय अभिनेत्री होत्या. त्यांनी अभिनय व सौंदर्याद्वारे प्रेक्षकांची मनं जिंकली. त्या फक्त अभिनयापुरतं मर्यादित न राहता, राजकीय क्षेत्रातही सक्रिय आहेत. त्या भारतीय जनता पक्षाच्या लोकसभा सदस्य आहेत. अशातच आता त्यांनी 'शोले' या चित्रपटाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. त्या म्हणाल्या, शोले करताना त्यावेळी माहीत नव्हतं की, हा चित्रपट इतका हिट होणार आहे. ५० वर्षांनंतर तुम्ही मला संसदेत याबद्दल प्रश्न विचाराल याची मी कल्पना केली नव्हती. त्यावेळी तर मला मी संसदेत येईन हेही माहीत नव्हतं. तो काळ खूप वेगळा होता. तो चित्रपट तेव्हा बनला; पण दुसरा 'शोले' बनवणं कठीण आहे. 'शोले' चित्रपट १५ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झाला होता. १५ ऑगस्टला या चित्रपटाला प्रदर्शित होऊन ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. या चित्रपटाचं दिग्दर्शन रमेश सिप्पी यांनी केलं होतं. हा चित्रपट जरी ९० च्या काळातील सुपरहिट चित्रपट असला तरी चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर त्याबद्दल सुरुवातीला नकारात्मक प्रतिसाद मिळाला होता आणि दोन आठवड्यांमध्ये तो बॉक्स ऑफिसवर अपेक्षित कमाई करू शकला नाही. परंतु, नंतर सकारात्मक मौखिक प्रसिद्धीमुळे हा चित्रपट चांगला चालला. दरम्यान, हेमा मालिनी यांनी ९० च्या काळात अनेक सुपरहिट चित्रपटांत काम केलं होतं. हेमा मालिनी त्या काळातील प्रेक्षकांमध्ये सर्वाधिक प्रसिद्ध असलेल्या अभिनेत्रींपैकी एक होत्या. त्यांना ड्रीमगर्ल म्हणूनही संबोधलं जातं. आजही प्रेक्षकांमध्ये त्यांची क्रेझ कायम आहे.



# फिर तुम्हारी याद आयीः सज्जाद हुसेन

**१९६३ साली सुरय्या यांनी 'रुस्तम-ए-सोहराब' चित्रपटात आपल्या स्वरातील जपून ठेवलेला गांधार, मधाळ व मदहोश स्वरात प्रकट करून रसिकांच्या अंगावर हलकेसे रोमांच उठविले. सज्जाद यांचे संगीत व सुरय्या यांचे स्वर मनात रेंगाळत राहतात. 'रुस्तम-ए-सोहराब'तील 'ऐ दिलरुबाऽऽ नजरे मिला' या गाण्यासाठी त्यांनी लता मंगेशकर यांची निवड केली. 'भटियार' रागातील ही चीज लता यांच्या तेजःपुंज स्वरात आळवून घेत हे गाणे अजरामर केले. यात अरेबियन वाद्यांचा उपयोग केला. 'नूरजहाँ' या सौंदर्य व संगीताचा मिलाफ असणार्या प्रसिद्ध गायिकेची प्रतिमा सज्जाद यांनी बदलली १९४५ सालच्या 'दोस्त' चित्रपटातील खालील गाण्याने. नूरजहाँ यांना नवी ओळख दिली.**



'ये कैसी अजब दास्तां हो गयी।
छुपाते छुपाते बयां हो गयी ।।'

'बदनाम मोहोब्बत कौन करे। और इश्क पे शिकवा कौन करे।।' नूरजहाँ या बदलावामुळे आनंदी झाल्या व म्हणाल्या, सज्जादजी, मेरे गले में इतना कुछ होगा, ये आपने कैसे पहेचाना था? धन्य है आप! गायकाच्या स्वरातील नुसती नोमथोम ओळखून जो संगीतकार त्याच्या गळ्यातील खजाना शोधू शकतो; तोच खरा प्रज्ञावंत व जाणकार संगीतकार. 'कोई प्रेम का दे दे संदेशा' या गाण्यात नूरजहाँ यांचा स्वर नुसता हिंदोळे घेत होता. रसिकांच्या हृदयात हुरहूर निर्माण केली. खर्या अर्थी नूरजहाँ यांना गायिका म्हणून श्रेष्ठत्व मिळवून देण्यात सज्जाद यांचेच संगीत कारणीभूत आहे. नूरजहाँ फाळणीनंतर पाकिस्तानला निघून गेल्यावर सज्जाद यांनी सुरय्या या तुल्यबल अभिनेत्री गायिका-नटीच्या आवाजावर मेहनत घेतली.

१९४६ सालच्या '१८५७' या चित्रपटातले सज्जाद यांचे संगीतच वेगळे आहे. 'मेरी हो गयी उनसे बात'- ही दोन्ही सुरय्या यांनी गायलेली अतिशय मधुर स्वरलालित्यातील गाणी विसरू शकत नाही. 'तेरी नजर मे मैं रहूं मेरी नजर मे तू---आऽआऽऽआऽऽऽ' स्वल्प आलापीतील हे गाणे अतिशय मोजक्या वाद्यातून शेकडो वाद्याचा भास निर्माण करणारे संगीत सज्जादच देऊ शकले. मी नेहमी जुन्या संगीतकारांच्या कौशल्याविषयी लिहीत असतो. कारण नवीन पिढीतील रसिकांना, पूर्वजांनी किती अनमोल खजाना ठेवला आहे, एकेक गाणे कसे तयार व्हायचे हे कळावे म्हणून. लता मंगेशकर या स्वरकोकिळेने सर्वच संगीतकारांच्या पारड्यात उत्कृष्ट दान टाकले. त्या म्हणत, सज्जाद यांचे गाणे गाताना कठीण पेपर सोडविल्यासारखे वाटायचे. त्यातूनही 'लताजी आप ठीक तरहसे गाइए' असे ठासून सांगणारा एकमेव संगीतकार म्हणजे सज्जाद हुसेन. 'दिल मे समा गये सनम। फूल खिले चमन चमन।।' याच चित्रपटातले हे गाणे लता व तलत यांचे हे गीत स्वरमंजुषेत चिरंतन जपावे असे आहे.

मीनाच्या दुःखद अभिनयाला साजेसे स्वरलालित्य सज्जाद यांनी लताच्या आवाजातून गाऊन घेतले. 'वो रात दिन वो श्याम की गुजरी हुयी कहानिया' १९५१ सालच्या 'सय्या' चित्रपटातील सज्जाद व लता यांचा संयुक्त आविष्कार! मधुबाला या आरसपाणी सौंदर्य लाभलेल्या अभिनेत्रीच्या विरही अवस्थेत उजाळा देणार्या आठवणी या गाण्यात आहेत. लताच्या करुण स्वरातून व संगीतातून वैफल्याची कैफियत उजागर केली आहे. ओ. पी. नय्यर 'ऐ दिलरुबा'सारखे गाणे आजवर कुणीही बनवू शकले नाही.

मदनमोहन प्रांजळपणे म्हणायचे की, त्यांच्या संगीताचा मूळ झराच सज्जाद यांच्या गाण्यातून प्रसवला आहे. रोशन 'फिर तुम्हारी याद आयी ओ सनम' या सज्जाद यांच्या कव्वालीतील ढंग व अंदाज मला कधी जमला नाही. दुसर्या समकालीन कलाकारांविषयी कृतज्ञ भाव व्यक्त करणारे कलाकार आता कुठायत्? सज्जाद यांची गाणी सहज गुणगुणायला मात्र अवघड असायची. प्रत्यक्ष लता म्हणाल्या, त्यांच्या गाण्याच्या रेकॉर्डिंगला जाताना देवाला प्रार्थना करूनच जावे लागायचे. सज्जाद हे दैववादी होते. ते स्वतः १५-१६ वाद्ये लीलया वाजवायचे. मेंडोलिनवर त्यांची हुकूमत तर जगजाहीर होती. ते चमत्कारी संगीतकार होते. एक प्रकारे अवलिया. स्वयंभू! सिनेमाव्यतिरिक्त मोठमोठ्या संगीत मेहफिली त्यांनी गाजविल्या. कलकत्ता येथील 'मेहफिल १९५६' मध्ये त्यांनी 'हरिकंस' राग मेंडोलीनवर आळवला अन् साक्षात बडे गुलाम अली खां यांची दाद मिळवली.

१५ जून १९१७ रोजी मध्य प्रदेशातील मंदसौरजवळील सीतामहू येथे त्यांच्या जन्म झाला. मो. अमीरखान हे त्यांचे वालीद होते. ते व्यवसायाने दर्जी होते व उत्तम सतारवादक होते. १९३७ साली सज्जाद हे मुंबईत आले. १९४४ साली संगीतकार हनुमानप्रसाद यांचे सहायक बनले. संगीतकार म्हणून स्वतंत्र संगीत 'दोस्त' (१९४५) या चित्रपटास दिले. ५० वर्षांपेक्षा अधिक काळ मुंबईत टॉप ग्रेड वादक म्हणून मेंडोलीन वाजविले. चित्रपटाव्यतिरिक्त भारतीय शास्त्रीय संगीत, अरबी संगीत व सुफी संगीतातही त्यांचे श्रेष्ठत्व होते. त्यांनी इनमिन १३ चित्रपटांना संगीत दिले. त्यातही मोठ्या बॅनरची केवळ ३. त्यांचे स्वर्गीय संगीतही चित्रपट यशस्वी करू शकले नाही. तरीही त्यांची गाणी बाहेरील माध्यमाद्वारे रसिकांच्या हृदयात कायमची विराजमान झाली. हा महान संगीतकार तत्कालीन दिग्गज संगीतकारांच्या गुरुस्थानी विराजमान झाला. प्रतिभेचं अमोघ वरदान लाभूनही प्रत्यक्षात दारुण अपयशाचे धनी झालेले सज्जाद यांना त्यांचा तिरकस स्वभाव कारणीभूत झाला. काहीही असले तरी त्यांनी अधिक चित्रपट न केल्यामुळे चित्रपटसृष्टीचे अतोनात नुकसान झाले हे खरे. लता मंगेशकर यांच्या आवाजाला 'खुदा की देण' म्हणणारे सज्जाद हुसेन मुंबईच्या एका उपनगरीत उराशी मेंडोलीन बाळगून गत आठवणीवर केवळ शेवटले आयुष्य जगले.

लता यांच्या शिफारशीवरून त्यांचा एक मुलगा कुणा संगीतकाराकडे बाशिंदा आहे. एवढ्या मोठ्या चित्रपटसृष्टीत त्यांची दखल घ्यावी, असे कुणालाच वाटले नाही. २१ जुलै २०२१ रोजी सज्जाद यांचे मेंडोलीन नेहमीसाठी स्तब्ध झाले. त्यांच्या अन्त्यविधीला सिनेमातील एक-दोन ज्युनिअर आर्टिस्टशिवाय कुणीही आले नाही. उगवत्या सूर्यालाच सर्व नमस्कार करतात एवढे मात्र खरे! त्यांनी विणलेल्या संगीताच्या कशिदीतला एकेक धागा उकलायचा क्षीण प्रयत्न म्हणजे हा लेख.

'हम ना भुलेंगे तुम्हे, अल्ला कसम।।'

**रमेश पोफळी**



# धनुष या मराठमोळ्या अभिनेत्रीच्या प्रेमात?

अभिनेत्री मृणाल ठाकूरची बर्थडे पार्टीची खूप चर्चा झाली, या पार्टीत साउथचा स्टार धनुष ही दिसला होता. 'सन ऑफ सरदार २' चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी धनुष मुंबईत गेला होता, ज्यामध्ये मृणाल ठाकूर आणि अजय देवगण मुख्य भूमिकेत आहेत. दोघांना एकत्र पाहून त्यांच्या अफेअरच्या चर्चांनी जोर धरला आहे. एका कार्यक्रमात धनुष आणि मृणाल आनंदाने बोलत असल्याचे दिसून आले, ज्याचा एक व्हिडिओ एक्स सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ट्रेंड होत आहे. मृणाल धनुषच्या जवळ जाते आणि काहीतरी बोलताना दिसते आहे. व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये लिहिले आहे, 'धनुष आणि मृणाल ठाकूर डेट करत आहेत का?' व्हिडिओवर प्रतिक्रिया देत चाहत्यांनी आपला आनंद व्यक्त केला आहे. एका नेटकऱ्याने लिहिले की, अद्याप याची पुष्टी झालेली नाही, परंतु ही हिंट आहे. दुसऱ्याने अंदाज लावला आहे, मला वाटते की ते फक्त मित्र आहेत. एका व्यक्तीने लिहिले की, खरंच? मला विश्वास बसत नाहीये. जुलैमध्ये धनुषचा आगामी सिनेमा 'तेरे इश्क में'साठी आयोजित केलेल्या पार्टीत मृणाल ठाकूर देखील सहभागी झाली होती. आनंद एल राय दिग्दर्शित या चित्रपटात क्रिती सनॉन दिसणार आहे. कनिका ढिल्लोंने नुकतीच इंस्टाग्रामवर फोटो पोस्ट केले होते, ज्यामुळे तिच्या फॉलोअर्सना या कार्यक्रमाची झलक पाहायला मिळाली. या फोटोमध्ये मृणाल ठाकूर आणि धनुष एकाच फ्रेममध्ये हसताना दिसत आहेत. 'तेरे इश्क में' चित्रपटाची टीम देखील बॅकग्राउंडमध्ये दिसली होती. धनुष आणि मृणाल ठाकूर दोघांनीही अफेअरच्या अफवांवर अद्याप काहीही प्रतिक्रिया दिलेली नाही. धनुषचे पूर्वी रजनीकांतची मुलगी ऐश्वर्याशी लग्न झाले होते. १८ वर्षे एकत्र राहिल्यानंतर त्यांनी २०२२ मध्ये वेगळे होण्याचा निर्णय घेतला. दोघांची पहिली भेट त्यांच्या 'कढल कोंडें' (२००३) या चित्रपटाच्या रिलीजच्या दिवशी झाली होती. धनुष आणि क्रिती सनॉनचा 'तेरे इश्क में' हा चित्रपट २८ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.

# 'देसी गर्ल' पुन्हा आयटम नंबरवर ठुमके लगावणार?


बॉलिवूडनंतर हॉलिवूडमध्ये आपल्या दमदार अभिनयाने ओळख निर्माण करणारी अभिनेत्री म्हणजे प्रियंका चोप्रा. क्वांटिको या सीरिजच्या माध्यमातून प्रियंका परदेशी प्रेक्षकांच्याही मनावर राज्य करु लागली आहे. पण, ती बॉलिवूडमध्ये फारशी सक्रिय असल्याची दिसली नाही. द स्काई इज पिंक चित्रपटानंतर अभिनेत्रीने हॉलिवूडकडे आपला मोर्चा वळवला. त्यात आता या अभिनेत्री संदर्भात महत्वाची अपडेट समोर येते. प्रियंका लवकरच एका बॉलिवूड चित्रपटात प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. त्यामुळे तिचे चाहते देखील प्रचंड खुश आहेत. रिपोर्टनुसार, बॉलिवूडची देसी गर्ल संजय लीली भन्साळी यांच्या लव्ह अँड वॉर चित्रपटात दिसण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे या चित्रपटात अभिनेत्रीचा एक डान्स नंबर असणार आहे, असं म्हटलं जात आहे. दरम्यान, याबाबत प्रियंका चोप्रा किंवा निर्मात्यांकडून कोणतेही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. परंतु प्रियंकाच्या कमबॅक बद्दल कळताच तिचे चाहते आनंदी आणि उत्साहित आहेत. प्रियंका याआधी राम लीला चित्रपटातील राम चाहे लीला हे गाणं सुपरहिट ठरलं होतं. आता ती पुन्हा एकदा डान्स नंबरमधून प्रेक्षकांच्या भेटीला येत असल्याचं सांगण्यात येत आहे. 'लव्ह अँड वॉर' मध्ये रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल हे चित्रपटात मुख्य भूमिकेत असल्याचे आधीच समोर आले



# 'रामायण'मध्ये आदिनाथ कोठारेची वर्णी

'रामायण' हा चित्रपट सिनेविश्वात सध्या प्रचंड चर्चेत आहे. नमित मल्होत्रा निर्मित आणि नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात रणबीर कपूर प्रभू श्रीरामाची भूमिका साकारत असून, साई पल्लवी सीतेच्या भूमिकेत दिसणार आहे. यश रावणाच्या भूमिकेत आहे, तर सनी देओल हनुमानाची भूमिका साकारणार असल्याची चर्चा आहे. याशिवाय मराठी अभिनेता आदिनाथ कोठारे या चित्रपटात 'भरत' ही भूमिका साकारणार आहे. काही दिवसांपासून या चित्रपटातील त्याच्या भूमिकेची सर्वत्र चर्चा सुरू आहे. अशातच आता स्वत: आदिनाथने एका मुलाखतीत या चित्रपटाबद्दल आणि भूमिकेबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. एका मुलाखतीत आदिनाथने यात भूमिका करायला मिळणं आशीर्वाद असल्याचं म्हटलं. अभिनेता म्हणाला, भारतात बनणाऱ्या सर्वात मोठ्या चित्रपटांपैकी 'रामायण' हा एक चित्रपट आहे. एवढंच नाही तर आज जागतिक पातळीवरही हा चित्रपट त्याच्या भव्यतेसाठी ओळखला जात आहे. या चित्रपटाचा भाग होणं ही माझ्यासाठी एक मोठी जबाबदारी आहे. या भूमिकेसाठी माझी निवड करणाऱ्या मुकेश छाब्रा तसंच नितेश तिवारी यांचे आभार मानतो. याशिवाय निर्माते नमित मल्होत्रा यांनी माझ्यावर विश्वास दाखवला, त्यासाठी मी त्यांचाही ऋणी आहे. यानंतर आदिनाथने चित्रपटाच्या निर्मिती प्रक्रियेबद्दल सांगितलं की, नितेश तिवारी आणि नमित मल्होत्रा हे दोघेही दूरदृष्टी असलेले व्यक्ती आहेत. या चित्रपटाच्या प्री-प्रोडक्शनवर जवळपास १० वर्षे त्यांनी मेहनत घेतली गेली आहे. शिवाय संहितेचं कामही २०१६-२०१७ पासून सुरू होतं. यानंतर आदिनाथ म्हणतो, जेव्हा मी या चित्रपटाची पटकथा ऐकली, तेव्हा मी थक्कच झालो. त्यानंतर आता त्यावर सर्वांचं सादरीकरण, व्हीएफएक्स आणि उत्तम निर्मिती हे सगळं दर्जेदार असणार आहे. खरं सांगायचं तर, मी आजवर वाचलेली ही सर्वोत्कृष्ट संहिता आहे.





# कार्तिक आर्यन करणार राजकारणात एन्ट्री?

अभिनेता कार्तिक आर्यन सध्या त्याच्या आगामी 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. या चित्रपटाचे शूटिंग राजस्थानमध्ये सुरू आहे. चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान अभिनेत्यानं राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांची भेट घेतली. या भेटीचा व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यावर अनेक प्रतिक्रिया उमटत आहेत. व्हिडीओमध्ये दोघेही एकमेकांशी हसत हसत बोलत असल्याचे दिसून येत आहे. यावेळी मुख्यमंत्री आणि कार्तिक आर्यन यांनी राज्यातील सांस्कृतिक वारसा, पर्यटन स्थळे आणि चित्रपट निर्मितीच्या शक्यतांवर चर्चा केली. या भेटीनंतर कार्तिक आर्यन राजकारणात प्रवेश करणार का? अशा चर्चांना सोशल मीडियावर उधाण आलं आहे. मात्र, आर्यनने यावर प्रतिक्रीया दिलेली नाही. कार्तिक आर्यनच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर तो लवकरच 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' या चित्रपटात दिसणार आहे. यात अभिनेत्री अनन्या पांडे देखील कार्तिक आर्यनसोबत दिसणार आहे. 'पती पत्नी और वो' या चित्रपटानंतर हा दोन्ही स्टार्सचा एकत्र दुसरा चित्रपट असेल. 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' हा चित्रपट करण जोहरच्या धर्मा प्रॉडक्शनच्या बॅनरखाली तयार होत आहे. समीर विद्वांस त्याचे दिग्दर्शन करत आहेत. हा चित्रपट पुढील वर्षी व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने प्रदर्शित होणार आहे. याशिवाय कार्तिककडे अनुराग बसू यांचा एक रोमँटिक संगीतमय चित्रपट देखील आहे, ज्याचे नाव 'आशिकी ३' असे आहे.